## निशाणी क्र.१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या व गैअर्जदार हिचे नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे, अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे वडिल व गैरअर्जदार हिचा मुलगा नामे प्रदिप तुळशीराम सोनुने यांचे दिनांक २३/११/२०२५ रोजी सरकारी दवाखाना, छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले आहे (यापूढे 'मयत' असे नमूद केलेले आहे). त्यामुळे, मयतास अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयत यांच्या पश्चात अर्जदार यांना भविष्यातील शासकिय, निमशासकिय व शैक्षणिक कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची (Legal Heirship Certificate) आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्याची मागणी केली आहे.

३. अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दै. 'लोकपत्र' या दिनांक २०.०१.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले आहे. तसेच जाहीर नोटीस न्यायालयाच्या सुचना फलकावर डकवली. मात्र मूदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. गैरअर्जदार यांना प्रस्तुत प्रकरणात हजर होण्यास बऱ्याच वेळा संधी देऊन हजर न झाल्याने प्रस्तुतच्या अर्ज त्यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

४. अर्जातील कथनांच्या अनुषंगाने अर्जदार क्र.१ हिने पुराव्याचे शपथपत्र

दाखल करून अर्जातील कथनांचा पुर्न:उच्चार केला आहे. अर्जदारांनी मयत यांच्या मृमयताचे मृत्यु प्रमाणपत्र व आधार कार्डची प्रत, अर्जदार क्र.१ ते ३ यांचे आधार ओळखपत्रांच्या प्रती, इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. तद्नंतर अर्जदार यांनी पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

५. वरील पुरावा व कागदपत्रांच्या अनुषंगाने, अर्जदार क्र.१ ते ३ व गैअर्जदार हे मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जदार यांना त्यांचे शैक्षणिक व सरकारी व निमशासकिय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ व गैअर्जदार यांना मयत यांचे वारस असल्याचे जाहिर करून त्यांना मागणीप्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) देणे योग्य व न्यायोचीत राहणार आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे ;

**<u>आदेश</u>**

१. अर्जदारांचा अर्ज पुढीलप्रमाणे मंजूर करण्यात येतो.

२. **अर्जदार क्र.१ ते ३ व गैअर्जदार** हे मयत प्रदिप तुळशीराम सोनुने यांचे कायदेशीर वारस असल्याचे जाहिर करण्यात येते.

३. कायदेशीर वारस प्रमाणपत्र देतांना प्रमाणपत्रावर खालील बाजूस दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ नुसार तळटिप टाकण्यात यावी.

४. अर्जदारांनी अर्जाचा खर्च सोसावा.

Digitally signed by ASHOK RAMAKANT SHENDGE
Date: 2026.06.17 18:07:53 +0530

दिनांकः १७/०६/२०२६

**(अ. र. शेंडगे)**
१५ वे सह–दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
औरंगाबाद.

**प्रमाणपत्र (ई–फाईल)**

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | किशोर रावसाहेब तांदळे |
| न्यायालयाचे नाव | : | अ.र. शेंडगे, १५ वे सह–दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, औरंगाबाद. |
| आदेशाची तारीख | : | १७/०६/२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | १७/०६/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १७/०६/२०२६ |